अधिसूचना

क्रमांक : १३१/२०२१ दिनांक : २/१२/२०२१

विषय :- **नविन महाविद्यालयाचे प्रथम संलग्निकरणाबाबत..**

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता अधिसूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने खाली दर्शविलेले नविन महाविद्यालय सुरु करण्यास शासन पत्रात नमुद केलेल्या अटींच्या अधिन राहुन कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेली आहे. त्याअनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समितीचा अहवाल दि. १३.१०.२०२१ च्या विद्या परिषदेने विषय क्र.९ अन्वये मान्य केल्यानुसार स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या संस्थेच्या स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या नविन महाविद्यालयास स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या अभ्यासक्रमाकरीता स्तंभ क्र. ६ मध्ये दर्शविलेल्या कालावधीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा, २०१६ मधील कलम १०८ व ११० मध्ये दर्शविलेल्या तरतुदींचे अधिन राहुन प्रथम संलग्निकरण प्रदान करण्यात येत आहे.

महाविद्यालयात उपरोक्त अभ्यासक्रमास प्रवेश देतांना शासनाने व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने निर्धारित केलेल्या नियमांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक आहे. मान्य प्रवेशक्षमतेपेक्षा अतिरीक्त विद्यार्थांना प्रवेश देण्यात येऊ नये.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे नियम, विनियम, अध्यादेश, परिनियम, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा, २०१६ मधील तरतुदी महाविद्यालयास बंधनकारक राहतील.

नियमानुसार शिक्षकांची तसेच शिक्षकेत्तर कर्मचा-यांची पदे भरणे संस्थेला बंधनकारक आहे.

शासन निर्णय क्र. युजीसी २००३/(३३/०३)/१ विशी-४, दिनांक ०६ एप्रील, २००३ प्रमाणे संस्थेच्या शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे नियमन करणे व शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून सर्व अभ्यासक्रमांच्या शुल्काचे प्रमाणिकरण करुन घेणे संस्थेस / महाविद्यालयास बंधनकारक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारण्यापूर्वी शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे प्रमाणिकरण शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून मान्य करुन घ्यावे व त्यानुसारच शुल्काची आकारणी करावी.

तसेच,शासन निर्णयातील अटी व शर्तीचे, संस्थेने/महाविद्यालयाने पालन करावे व तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा, २०१६ मधील कलम १०८ नुसार त्वरीत हमीपत्र सादर करणे संस्थेवर बंधनकारक आहे.

तक्ता

अ.क्र.	संस्थेचे नांव व पत्ता	महाविद्यालयाचे नांव, ठिकाण व सांकेतिक क्रमांक	विद्याशाखा/ अभ्यासक्रम	प्रवेश क्षमता	संलग्निकरणा चा कालावधी	शासन निर्णय क्र. व दिनांक
१.	२.	३.	४.	५.	६.	७.
१.	स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक बहुउद्देशिय संस्था, वामननगर , खामगांव, जि.बुलडाणा	गुंजकर कॉलेज,आवार, ता.खामगांव, जि.बुलडाणा (१००७)	**बी.ए.भाग १** (मानव विज्ञान विद्याशाखा.) इंग्रजी, मराठी, हिंदी, इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मराठी साहित्य, इंग्रजी साहित्य, भूगोल, मानसशास्त्र, गृहअर्थशास्त्र **बी. कॉम. भाग-१** (वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा) **(अभ्यासक्रमिकेनुसार)** **माध्यम-** मराठी व इंग्रजी **बी.एस्सी. भाग १** (विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा.) इंग्रजी, मराठी, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र,वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र, सुक्ष्मजीवशास्त्र, संगणकशास्त्र, परमाणुशास्त्र, गणित, सांख्यिकी, भुगर्भशास्त्र	१२० १२० १२०	२०२१-२०२२ करीता.	शासन निर्णय क्र. एनजीसी-२०२१/(१८५/२१) /मशि-४, दि.३१ ऑगस्ट २०२१

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

अधिसूचना

क्रमांक : १३२/२०२१ दिनांक : २-१२-२०२१

विषय : संलग्निकरण प्रदान करण्यासाठी निर्गमीत करण्यात आलेल्या अधिसुचनेमधील दुरुस्तीबाबत...

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता अधिसूचित करण्यात येते की, संलग्निकरणाबाबत विद्यापीठ अधिसुचना क्र.६७/२०२१, दि.०८/०७/२०२१ निर्गमित करण्यात आलेली आहे. त्यामध्ये Gazette Part-II च्या पृष्ठ क्र.२०२ वरील अ.क्र.१०६ वरील असलेले स्तंभ क्र.२ मधील "Vivekand Science College, Vivekand Nagar, Hiwara Ashram,Tq.Mehkar,Distt:-Buldana.(365)" या महाविद्यालयाचे नांव "Vivekanand Science College, Vivekanand Nagar, Hiwara Ashram,Tq.Mehkar,Distt:-Buldana.(365)" असे वाचण्यात यावे.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****